स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता मतदार यादी तयार करण्याच्या अनुषंगाने एकत्रित आदेश -

मतदार यादीत संभाव्य दुबार नावांबाबत करावयाची उपाययोजना

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक: रानिआ-२०२५/ग्रापंनि/प्र.क्र.०३/का.८
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २९ ऑक्टोबर, २०२५

**संदर्भ** :- राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.०३/का.८, दिनांक १६ जुलै २०२५ चे आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करणे व या निवडणुकांचे अधीक्षण, संचलन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे;

ज्याअर्थी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १९(ब), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ७-अ, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६१ चा महा. ५) च्या कलम १३, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम१२ अन्वये,राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात

असलेली विधानसभेची मतदार यादी (लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या तरतुदीन्वये तयार केलेली) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता संबंधित महानगरपालिका, नगरपरिषद/नगरपंचायत, ग्रामपंचायत यांचे प्रभाग तसेच जिल्हा परिषद निवडणूक विभाग/पंचायत समिती निर्वाचक गणात विभागून व अधिप्रमाणित करुन वापरण्याबाबत तरतूद आहे;

ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी संबंधित महानगरपालिका, नगरपरिषद/नगरपंचायत, ग्रामपंचायत यांचे प्रभागामध्ये; तसेच जिल्हा परिषद निवडणूक विभाग/पंचायत समिती निर्वाचक गणात विभागून वापरण्यात येते, मात्र असे करीत असताना सदर मतदार यादीमध्ये मूळ विधानसभा मतदार यादीत नसलेली कोणतीही नवीन नावे समाविष्ट करण्याचे अथवा मूळ विधानसभा मतदार यादीत असलेली नावे वगळण्याचे; तसेच त्यामध्ये कोणत्याही दुरुस्त्या करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास किंवा राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांची मतदार यादी तयार करण्याकरिता प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास नाहीत;

आणि ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्यासाठी मतदार यादी बिनचूक असणे आवश्यक आहे; या तत्वाचे पालन करण्याच्या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरण्यात येणाऱ्या मतदार यादीत संभाव्य दुबार नावे आढळल्यास त्या बाबतीत अनुसरावयाची कार्यपध्दती स्पष्ट करणे गरजेचे आहे, असे राज्य निवडणूक आयोगाचे मत झाले आहे.

त्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग, भारतीय संविधानातील उपरोक्त नमूद तरतुदी व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिनियमांतील तरतुदींच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश देत आहे :

१. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी वापरण्यात येते. सदर मतदार यादी महानगरपालिका, नगरपरिषद/नगरपंचायत, ग्रामपंचायत यांमध्ये प्रभागनिहाय; तसेच जिल्हा परिषद निवडणूक विभाग/पंचायत समिती निर्वाचक गणनिहाय विभागणी करुन प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्यात येते. या यादीवर जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यात येऊन, प्राप्त हरकती व सूचनांवर योग्य तो निर्णय घेऊन, ती प्रभागनिहाय, जिल्हा परिषद निवडणूक विभागनिहाय/पंचायत समिती निर्वाचक गणनिहाय अंतिम मतदार यादी म्हणून प्रसिद्ध करण्यात येते. सदरची कार्यवाही राज्यामधील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी नेमण्यात आलेल्या प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून करण्यात येते.

२. या दरम्यान, विविध माध्यमातून राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रारुप अथवा अंतिम मतदार यादीत काही नावे एकापेक्षा अधिक वेळा (दुबार, तिबार, ..., ...) आली आहेत. सदर बाबींची दखल घेऊन; तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये वापरण्यात येणारी मतदार यादी ही शक्य तितकी अचूक असावी, या दृष्टिकोनातून संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यांनी खालील नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी :-

(१) राज्य निवडणूक आयोगाने त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील मतदार यादी डाऊनलोड करून व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यासाठी संकेतस्थळावर Access मिळावा म्हणून लॉगिन आयडी व पासवर्ड उपलब्ध करून दिला जातो, त्याचा वापर करून त्या अधिकाऱ्यांनी लॉगिन करावे.

(२) सदर लॉगिन आयडी व पासवर्डचा वापर करून Access केल्यानंतर "Report" या मुख्य टॅबखाली "दुबार रिपोर्ट" असा सबमेन्यू देण्यात आलेला आहे. या सबमेन्यूवर Click केल्यावर आपल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार यादीमध्ये किती मतदारांची नावे एकापेक्षा अधिक वेळा आलेली आहेत, त्यांची यादी सविस्तर तपशिलासह दिसून येते. या मतदार यादीमध्ये संभाव्य दुबार मतदाराच्या नावासमोर( **) असे चिन्ह दिलेले आहे. या यादीतील संभाव्य दुबार मतदारांबाबत स्थानिकरित्या तपासणी करून ती खरोखरच एकाच व्यक्तीची आहे किंवा वेगळ्या व्यक्तींची आहे, याबाबत खात्री करणे आवश्यक आहे. यासाठी मतदाराचे नाव, लिंग, पत्ता व छायाचित्र याची प्राथमिक तपासणी करून त्यांत साम्य आढळून आल्यास संबंधित मतदाराशी संपर्क साधून त्याच्याकडून आवश्यक माहिती मिळवावी.

(३) त्यानुसार एकापेक्षा जास्त नाव असलेला मतदार हा प्रत्यक्षात एकच व्यक्ती आहे, याची खात्री झाल्यानंतर त्या मतदाराकडून तो नेमका कोणत्या प्रभागातील, जिल्हा परिषद निवडणूक

विभागातील/पंचायत समितीच्या गणातील मतदान केंद्रावर मतदान करणार आहे, याबाबतचा अर्ज **(परिशिष्ट एक)** सोबत जोडलेल्या नमुन्यात घेण्यात यावा. त्यानुसार प्राधिकृत अधिकाऱ्याची खात्री पटल्यानंतर संबंधित मतदारास त्याच्या इच्छेप्रमाणे मतदान करण्यासाठी प्रभाग/जिल्हा परिषद निवडणूक विभाग/पंचायत समिती गण यांतील मतदान केंद्र निश्चित करावे. संबंधित मतदारांस त्याने निवडलेल्या प्रभागातील / जिल्हा परिषद निवडणूक विभागातील/पंचायत समिती गणातील मतदान केंद्रातच मतदान करण्याचा अधिकार असेल व इतर प्रभागात/ जिल्हा परिषद निवडणूक विभाग/ पंचायत समिती गणात देखील नाव असलेल्या अशा मतदाराच्या नावासमोर "दुबार मतदार, प्रभाग / जिल्हा परिषद निवडणूक विभाग/ पंचायत समिती गण क्रमांक ..... मतदार क्रमांक ...." अशी नोंद करून संबंधित मतदार ज्या प्रभागात/ जिल्हा परिषद निवडणूक विभागात/ पंचायत समिती गणात मतदान करणार आहे त्याचा क्रमांक व मतदाराचा अनुक्रमांक नमूद करेल. अशी नोंद झालेल्या मतदारास उर्वरित कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान करता येणार नाही.

(४) जर एकापेक्षा अधिक नावे असलेल्या **मतदाराकडून प्रतिसाद न मिळाल्यास** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार यादीमध्ये अशा मतदाराच्या नावासमोर "दुबार मतदार" अशी नोंद घेण्यात यावी. अशी नोंद असलेला **मतदार मतदान केंद्रावर मतदान करण्यास**

**आल्यास** त्या मतदाराकडून त्याचे नाव असलेल्या **इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान केले नसल्याबाबत सोबतच्या नमुन्यातील हमीपत्र (परिशिष्ट दोन) लिहून घेण्यात यावे** व अशा मतदाराची काटेकोरपणे ओळख पटवून त्यास मतदान करू देण्याची मुभा द्यावी.

(५) अशा पध्दतीने प्राप्त झालेली हमीपत्रे चिन्हांकित मतदार यादीसाठी असलेल्या लिफाफ्यामध्ये ठेवण्यात यावीत.

३. ही कार्यवाही करताना मतदारांची ओळख पटण्यासाठी त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू असलेले अधिनियम, नियम व आदेशांमध्ये नमूद तरतुदींचे मतदान केंद्राध्यक्षांनी काटेकोरपणे पालन करावे.

सदर आदेश राज्यातील सर्व ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी लागू राहतील.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

२८.१०.२०१५

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत-

१. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र, मंत्रालय, मुंबई
२. विभागीय आयुक्त (सर्व)
३. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)
४. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
५. मुख्याधिकारी, नगरपरिषदा/ नगर पंचायती (सर्व)
६. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
७. निवड नस्ती.

# परिशिष्ट-एक

प्रति,
मतदार यादी तयार करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी,
---------------- जिल्हा परिषद निवडणूक विभाग / पंचायत समिती गण
---------------- महानगरपालिका प्रभाग
---------------- नगरपरिषद प्रभाग/नगरपंचायत प्रभाग
----------------ग्रामपंचायत प्रभाग

मी, ---------------------------- ---------राहणार ------------------------ ---------------- याद्वारे कळवितो / कळविते की, माझे नाव उपरोक्त नमूद स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार यादीत खालील प्रभागात /जिल्हा परिषद निवडणूक विभागात / पंचायत समिती गणात समाविष्ट करण्यात आले आहे.

१.

२.

३.

४.

उपरोक्त नमूद स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मी ------------- प्रभागात / जिल्हा परिषद निवडणूक विभागात/ पंचायत समिती गणातील मतदान केंद्र क्र.-----वर मतदान करू इच्छितो. तरी मला यानुसार मतदान करण्याची परवानगी देण्यात यावी. मला नेमून दिलेल्या मतदान केंद्राशिवाय मी इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान करणार नाही.

उपरोक्त नमूद बाबीचा माझ्याकडून भंग झाल्यास संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अस्तित्वात असलेल्या निवडणूकविषयक अधिनियम / नियमातील तरतुदीनुसार शिक्षेस मी पात्र असेल, याची मला पूर्ण जाणीव आहे.

दिनांक :

मतदाराची स्वाक्षरी

ठिकाण

# परिशिष्ट-दोन

## मतदाराकडून घ्यावयाचे हमीपत्र (मतदानाच्या दिवशी)

मी, ______________________________,

या द्वारे हमी देतो/देते की, माझे नाव ----------- या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ------(प्रभागाचे नाव किंवा क्रमांक / जिल्हा परिषद निवडणूक विभाग /पंचायत समिती गण) या प्रभागातील/ जिल्हा परिषद निवडणूक विभागातील/ पंचायत समिती गणातील मतदार यादीत असून, मी दिनांक ----------- रोजी मतदान असलेल्या ---------- या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक/पोटनिवडणुकीत मतदान केंद्र क्रमांक ------------- या मतदान केंद्रावरच मतदान करणार आहे.

मी अशीही हमी देतो/देते की, मी दिनांक ----------- रोजी मतदान असलेल्या ------------- या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक / पोटनिवडणुकीकरिता वापरण्यात येणाऱ्या मतदार यादीत कोणत्याही पद्धतीने माझ्या नावाची एक किंवा अनेक ठिकाणी जरी दुबार पध्दतीने नोंद झाली असली तरीही वरील परिच्छेदात नमूद केलेल्या मतदान केंद्राशिवाय इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मी मतदान केले नाही व करणार नाही.

मी, हमी देतो/देते की, उपरोक्त परिच्छेदामधील नमूद बाबीचा माझ्याकडून भंग झाल्यास संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अस्तित्वात असलेल्या निवडणूकविषयक अधिनियम / नियमातील तरतुदीनुसार शिक्षेस पात्र असेल, याची मला पूर्ण जाणीव आहे.

दिनांक :

______________________

(स्वाक्षरी)

ठिकाण :

(मतदाराचे नाव)